# समिती दर्पण

**जानेवारी २०२६**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १३०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# कल्याणराव जाधव स्मृती भवनाचे उद्‌घाटन

## अहिल्यानगरमध्ये मुलांसाठी वसतिगृह; १२० विद्यार्थ्यांची होणार सोय

विद्यार्थी साहाय्यक समितीने गेल्यावर्षी पुण्याबाहेर प्रथमच पाऊल टाकत अहिल्यानगरमध्ये मुलींसाठी वसतिगृह सुरू केले आणि आता मुलांसाठीही वसतिगृह सुरू करून खऱ्या अर्थाने पर्यवेक्षक (कै.) रमाकांत तांबोळी यांचे स्वप्न पूर्ण केले.

चार मजली देखण्या इमारतीच्या प्रवेशद्वारापासून स्वागतकक्ष, तसेच वरच्या मजल्यावर जाणाऱ्या प्रत्येक पायरीवर साकारलेल्या फुलांच्या रांगोळ्या, पाहुण्यांच्या स्वागतासाठी सर्वत्र केलेली सजावट, पुण्याहून आलेले समितीचे विश्वस्त आणि कार्यकर्त्यांची लगबग आणि त्यांच्या मदतीसाठी धावपळ करणारे विद्यार्थी अशा उत्साही आणि उत्स्फूर्त वातावरणात प्रजासत्ताक दिनाच्या मुहुर्तावर २६ जानेवारीला कल्याणराव जाधव स्मृती भवन या मुलांसाठीच्या वसतिगृहाचे उद्‌घाटन झाले. दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांनी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून अहिल्यानगरमध्ये नगर- कल्याण मार्गावर ही देखणी वास्तू उभी राहिली आहे. या वसतिगृहात एकूण ४० खोल्या असून १२० विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. या खेरीज ग्रंथालय आणि संगणक कक्षही आहे.



या वास्तूच्या कोनशिलेचे उद्‌घाटन विनोद जाधव, त्यांच्या पत्नी सौ. सुवर्णा जाधव, बंधू विशाल जाधव यांच्या हस्ते झाले. फिशर मेजरमेंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. या कंपनीच्या देणगीतून उभारलेल्या संगणक कक्ष व ग्रंथालयाचे उद्‌घाटन यावेळी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राकेश भान आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे वसतिगृहातील दोन खोल्यांचे उद्‌घाटन विनोद जाधव आणि समितीचे माजी विद्यार्थी विजय कदम यांच्या हस्ते झाले. यातील एका खोलीसाठी विजय कदम यांनी तर दुसऱ्या खोलीसाठी पुण्यातील सरोजिनी मनोहर यांनी देणगी दिलेली आहे.

या कार्यक्रमास समितीचे कायम विश्वस्त आणि मराठवाडा मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव, स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, सचिन इटकर, विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, विश्वस्त रत्नाकर मते, मकरंद फडके, संजय अमृते, मनोज गायकवाड, विनया ठोंबरे, नंदकुमार तळेकर, प्रभाकर पाटील, दिनकर वैद्य, ज्ञानेश्वर गटकळ, शिवाजी बोलभट, नंदकुमार देशपांडे, चंद्रकांत कुलकर्णी, दुर्गेश पवार, जिभाऊ शेवाळे, राजेंद्र ततार, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, मनिषा गोसावी, सुनील चोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन समितीच्या नगरमधील कार्यकर्त्या सुनीता झिंजाड यांनी केले तर रवींद्र देशपांडे यांनी आभार मानले.

> शिक्षणाच्या माध्यमातून सामान्य कुटुंबातील मुलांना पुढे जाण्याची संधी मिळावी, यासाठी माझ्या वडिलांचे सतत प्रयत्न होते. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्याचे त्यांचे स्वप्न होते. समितीचा माजी विद्यार्थी आणि माझा मित्र विजय कदम यांच्यामुळे समितीशी जोडला गेलो. अशा सेवाभावी आणि मूल्याधिष्ठित संस्थेचा एक भाग होता आले, याचा मनापासून अभिमान आहे.
>
> - **विनोद जाधव,** दुबईस्थित उद्योजक

# स्वप्ने आणि मूल्ये यांना 'एआय'ची साथ

## उद्योग मार्गदर्शनाबरोबर विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव

एआय आणि मानवी मूल्यांचा समतोल या संकल्पनेवर आधारित उद्योजकता परिषद अनेक विद्यार्थ्यांसाठी विचार बदलविणारी, आत्मविश्वास वाढविणारी आणि स्वप्नांना नवी दिशा देणारी ठरली.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार उद्योजकता विकास कक्ष (Entrepreneurship Development Cell) ११ जानेवारी रोजी श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात चौथी उद्योजकता परिषद झाली. समितीचे किमान दहा टक्के विद्यार्थी उद्योजक व्हावेत, या विचारातून दरवर्षी होणाऱ्या या परिषदेतून विद्यार्थ्यांना उद्योगांविषयी मार्गदर्शन करतानाच, नफा कमावण्याबरोबरच समाजासाठी काहीतरी देणे हीच उद्योजकतेची खरी ओळख असल्याचे अधोरेखित केले गेले.

"Entrepreneurship 2.0 : Human Wisdom, Accelerated by AI" ही यंदाच्या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना होती. समितीच्या विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे यांची ही कल्पना होती आणि त्याला अनुसरूनच वक्त्यांची निवड होती.



परिषदेत सुरुवातीला विद्यार्थ्यांनी उद्योजकता गीत सादर केले. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी स्वागत व प्रास्तविक केले.

### विद्यार्थ्यांच्या कल्पनांना मूर्त रूप

विद्यार्थी स्टार्टअप प्रदर्शनामध्ये कल्पनांना मूर्त रूप मिळाले. काही कल्पना अजून सुरुवातीच्या टप्प्यावर होत्या, तर काही आशादायक वाटत होत्या. मेंटॉर– मेंटी कनेक्ट सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या शंका आणि स्वप्ने मोकळेपणाने मांडली.

### आपणही करू शकतो, हा आत्मविश्वास

विद्यार्थ्यांनी उद्योजकता कल्पना या विषयावर सादरीकरण केले. आलम्री प्रेझेंटेशन, बिझनेस आयडिया प्रेझेंटेशन, स्थानिक समस्यांवर आधारित व्यवसाय मॉडेल्स यांतून विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती आणि समाजाबद्दलची जाणीव दिसून आली. 'आपणही करू शकतो' हा आत्मविश्वास अनेकांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

> उद्योजकतेकडे केवळ करिअर म्हणून नव्हे, तर समाजाप्रति जबाबदारी म्हणून पाहावे.
>
> - **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

> यश एका रात्रीत मिळत नाही. सातत्य, चुका स्वीकारण्याची तयारी आणि शिकण्याची वृत्ती हेच खरे भांडवल असते.
>
> - **हर्षल मोर्डे,** संचालक, मोर्डे फूड्स प्रा. लि.

> तंत्रज्ञान आणि एआय हे निर्णय घेणे सोपे करतात, निर्णय का घ्यायचा, कोणासाठी घ्यायचा, हे ठरविणे माणसाचेच काम आहे.
>
> - **सत्यजित हांगे,** संस्थापक, टू ब्रदर्स ऑरगॅनिक फार्म्स

> भीती न बाळगता बदल स्वीकारा. एआयमुळे नोकऱ्या जातील, या भीतीपेक्षा, नव्या संधी कशा निर्माण होतील, याकडे पाहा.
>
> - **विवेक सावंत,** मुख्य मेंटॉर, एमकेसीएल



# विद्याधामचे माजी विद्यार्थी दरमहा देणार अन्ननिधी

शिक्रापूर (ता. शिरुर, जि. पुणे) येथील विद्याधाम प्रशालेच्या १९८५ च्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी समितीच्या १३०० विद्यार्थ्यांच्या एक वेळेच्या जेवणाचा खर्च उचलला. हा ग्रुप दरमहा एकवेळच्या जेवणाचा अन्ननिधी देणार आहे.

विद्यालयाचे माजी विद्यार्थी व भारतीय जैन संघटनेच्या पिंपरी येथील महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप देशमुख व पाटेठाण साखर कारखान्याचे संचालक अनिल भुजबळ यांनी नुकतीच समितीला भेट देऊन कार्याची माहिती घेतली. त्यानंतर ते वेगवेगळ्या माध्यमातून समितीशी जोडलेले आहेत. समितीच्या कार्यासाठी बॅचच्या वतीने १६ हजार रुपयांची देणगी दिली आहे. यापुढे दर महिन्याला हे माजी विद्यार्थी अन्ननिधी देणार आहेत.



*Regreen Excel EPC India Pvt. Ltd. या कंपनीने सीएसआरअंतर्गत दिलेल्या देणगीतून समितीच्या श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात बांधलेल्या तीन खोल्यांचे उद्‌घाटन ३१ जानेवारी रोजी कंपनीच्या व्हाइस प्रेसिडेंट पल्लवी देसाई यांच्या हस्ते झाले.*

तयाचा वेलू...

# समितीतील संस्कारांमुळे आयुष्याला दिशा

बाळाचे पाय पाळण्यात दिसतात..., या म्हणीचा प्रत्यय विद्यार्थी साहाय्यक समितीचे माजी विद्यार्थी विजय कदम यांच्या लहानपणीच्या एका प्रसंगावरून येतो. चौथी-पाचवीत असताना त्यांनी पुणे आकाशवाणीला पत्र लिहिले होते आणि डीफेन्स आणि इंजिनीअरिंग या दोन क्षेत्रांमध्ये करिअर कसे करायचे, याची चौकशी केली होती.

विजय कदम यांचे जन्मगाव इंदापूर तालुक्यातील घोरपडवाडी. फक्त सातवीपर्यंत शाळा असलेले हे गाव. शाळेत असल्यापासून विजय यांना आकाशवाणीवरील माहितीपर कार्यक्रम ऐकण्याचा छंद होता. तेथे पत्र पाठवून प्रश्न विचारता येतात, हे त्यांना माहिती झाले, पण ते पत्र टाकायला त्यांच्या गावात पोस्ट ऑफिस नव्हते. भाडे देऊन सायकल घेतली व ते आठ- दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या पोस्टात पत्र टाकायला गेले होते!!

विजय यांचे आईवडील शेतकरी, चार बहिणी, चार भाऊ असे मोठे कुटुंब. विजय सगळ्यांत धाकटे. घरची परिस्थिती जेमतेमच. पण मोठ्या भावांनी एकमेकांना शिक्षणासाठी जमेल तशी मदत केली. त्यावेळी चांगले शिक्षण घेऊन लवकरात लवकर चांगले कमवायला लागायचे, हे विजय यांचे एकमेव ध्येय होते आणि त्याचा त्यांनी योग्य तऱ्हेने पाठपुरावाही केला. पटकन होणारे चांगलं शिक्षण म्हणजे टेक्निकल डिप्लोमा. त्यासाठी टेक्निकल हा विषय शाळेपासून शिकला पाहिजेत. उरुळी कांचनमधील शाळेत हा विषय आहे आणि हॉस्टेलही आहे, ही माहिती मिळवून त्यांनी आठवीपासून तेथे प्रवेश घेतला. बारावीपर्यंतचे शिक्षण उरुळीच्या शाळेत घेतले.



पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्यात आले. वाडिया कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली. मनापासून प्रयत्न करणाऱ्याला नशीबाची साथ मिळते, त्याप्रमाणे विजय यांना समितीत प्रवेश मिळाला. हॉस्टेलमध्ये राहण्याची सवय होतीच. समितीच्या वसतिगृहात झोपायला गादी-उशी, पोटभर जेवण, सकाळी दूध यामुळे ते सहज सामावून गेले. शिवाय कष्टाची, लवकर उठण्याची, शिस्तीत वागण्याची सवय होतीच. प्रामाणिकपणाही अंगी होता. या सगळ्या गोष्टींचा आणि समितीतील शिस्तीचा योग्य मेळ बसला आणि ते समितीमध्ये रमले.

पर्यवेक्षक रमाकांत तांबोळी सरांचा उल्लेख विजय "गुरुवर्य" असा करतात. गिंडी सर, निर्मलाताई यांच्याही कित्येक आठवणी मनावर कोरलेल्या आहेत, या सगळ्यांमुळेच मी घडलो, असे ते सांगतात. समितीमध्ये वेगवेगळया उपक्रमांमध्ये भाग घेतल्यामुळे जिवाभावाचे मित्र मिळाले, ज्यांच्याशी अजूनही मैत्री कायम आहे. समितीतील दिवसांबद्दल ते भरभरून आणि आत्मीयतेने बोलतात. त्यांचे पालक प्रा. लिमये आणि श्री. नाफडे यांच्याकडून त्यांना अनेक गोष्टी शिकता आल्या. विजय यांची हुशारी आणि मन लावून काम करण्याची पद्धत पाहून त्यांना शिकविण्याची "कमवा शिका" मिळाली होती.

समितीत मिळालेल्या या सगळ्या शिक्षणानेच विजय यांच्या पुढील करिअरचा पाया रचला. शिक्षण संपताच त्यांना ATCO कंपनीत नोकरी मिळाली. तेथे दोन माणसे एका वर्षात जेवढा रेव्हेन्यू मिळवायची, तेवढा त्यांनी पहिल्याच महिन्यात मिळवून दाखविला आणि त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. "I'm always at your service," हे त्यांचे ब्रीद आणि त्यापासून ते कधीच मागे हटले नाहीत.

ते म्हणतात, "आपले काम मन लावून करणे, वरिष्ठ आणि ग्राहकांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी कष्ट करणे, हा माझा गुण. पण त्यामुळेच मी साधा डिप्लोमा होल्डर असूनही माझ्या हाताखाली कित्येक इंजिनीअर काम करीत होते." नंतर एखादी डिग्री असावी म्हणून त्यांनी एम.बी.ए. पदवी गोल्ड मेडलसह मिळविली.

विजय कदम सध्या दुबईमध्ये Danway Emirates या कंपनीमध्ये जनरल मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. "समितीशी माझा संबंध कधीच तुटला नाही. मला जे जमेल, ते मी समितीसाठी करीत राहिलो. मग ते आजीव पालक होणे असेल, भारताच्या प्रत्येक ट्रीपमध्ये समितीला भेट देणे, देणगी देणे असेल, ओळखीतून देणग्या मिळवून देणे असेल, मोठी स्वप्न बघायला समितीला मदत करणे असेल. तांबोळीसरांच्या म्हणण्यावरून मोठ्या देणग्या जमा करायला सुरुवात झाली आणि मनात आणलं तर, चांगल्या कामासाठी कोणालाही, कितीही निधी उभा करता येऊ शकतो, याचा अनुभव घेतला," असे ते सांगतात.

समितीच्या माजी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांमध्ये विजय सहभागी होतात. नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. विजय यांना एक मुलगा, एक मुलगी. दोघेही उच्चविद्याविभूषित आहेत. सध्या चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. "माझ्या कष्टांची मुलांना जाण आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. माझी पत्नी माझ्या सगळ्या उपक्रमांत खंबीरपणे पाठीशी उभी असते," असे विजय यांनी नमूद केले.

# सुनीता भोसले, मंगेशी मून यांचा सन्मान

## वसुधा परांजपे पुरस्कारांचे अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते वितरण

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी कार्यकारी विश्वस्त वसुधा परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ समिती आणि परांजपे कुटुंबीयांतर्फे दिला जाणारा श्रीमती वसुधा परांजपे स्मृती समाजसेवा पुरस्कार क्रांती फाऊंडेशनच्या संस्थापक सुनीताताई भोसले यांना, तर वसुधा परांजपे स्मृती शिक्षणसेवा पुरस्कार उमेद एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक मंगेशीताई मून यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. आपटे वसतिगृहात १७ जानेवारीला झालेल्या या कार्यक्रमात माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. प्रत्येकी ५० हजार रुपये रोख, मानपत्र व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

### पाच विद्यार्थिनींना अर्थसहाय्य

भावना देशमुख, नंदिनी शिंदे, श्रावणी वेदपाठक, मयुरी शेळके आणि प्रेरणा मालुसरे या समितीतील पाच गरजू विद्यार्थिनींना प्रत्येकी १० हजार रुपये अर्थसाह्य देण्यात आले. डॉ. आपटे वसतिगृहात झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ना. परांजपे, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. उज्ज्वला बर्वे यांनी पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. सुप्रिया केळवकर तसेच सानिका जोशी यांनी परिचय करून दिला. विद्यार्थिनी प्रेरणा मालुसरे हिने सूत्रसंचालन केले.




"कुठल्याही गोष्टीचा ध्यास घेऊन समर्पित वृत्तीने कार्यरत राहणे, हे महाराष्ट्राचे वेगळेपण आणि वैभव आहे. ध्येयासक्त, समर्पित व सेवाभावी वृत्तीने सामाजिक कार्य व्यापक होते. मंगेशीताई मून आणि सुनीताताई भोसले यांच्या कार्यातून त्याची प्रचीती येते.
- **अविनाश धर्माधिकारी,** माजी सनदी अधिकारी

"रस्त्यावरच्या अनाथ मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून जबाबदार समाजघटक बनविण्याचा प्रयत्न उमेद ट्रस्टतर्फे केला जातो. आज अनेक मुले शिक्षण घेऊन उत्तम काम करीत आहेत. समितीचा हा पुरस्कार आमच्यासाठी अभिमानास्पद आणि आनंदाचा आहे.
- **मंगेशीताई मून,** संस्थापक,
उमेद एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट

"फासेपारधी म्हणून आम्हाला गुन्हेगार मानले जाते. आईमुळे शिक्षणाचे महत्त्व समजले. शाहू महाराज, अण्णा भाऊ साठे यांचे कार्य उमगले. सामाजिक कार्यासाठी संस्था स्थापन केली. आम्ही भटके विमुक्त असल्याने प्रशासन, शासन आणि समाजाकडून त्रास सहन करावा लागतो. देशाचे नागरिकत्वही नाकारले जाते.
- **सुनीताताई भोसले,** संस्थापक,
क्रांती फाऊंडेशन

# प्रदर्शनातील चित्रांच्या विक्रीतून समितीला ६२ हजारांची देणगी

समितीचे कार्यकर्ते हेमंत राजहंस यांच्या निसर्गचित्रांचे प्रदर्शन २७ व २८ डिसेंबर रोजी दर्पण आर्ट गॅलरी येथे भरविण्यात आले होते. या प्रदर्शनातील ४५ चित्रांची विक्री झाली. त्यातून जमा झालेली सर्व रक्कम श्री. राजहंस यांनी समिती व इतर दोन सामाजिक संस्थांना देणगी म्हणून दिली. या उपक्रमातून समितीला ६२ हजार रुपये देणगीदाखल मिळाले.



समिती वृत्त

# भारताला विकसित करण्यासाठी समर्पण करा

## निवृत्त मेजर शफिक शेख यांचे प्रजासत्ताक दिनी आवाहन

जे करायचे, ते साध्य होण्यासाठी कष्ट करा, त्यासाठी वेळ द्या. कोणाचा तरी आधार बना, मार्गदर्शक बना. तुम्ही भारताला विकसित करणार आहात, विद्यार्थी म्हणून तुमचे समर्पण पाहिजे, हृदयात आग पाहिजे, असे प्रतिपादन निवृत्त मेजर शफिक शेख यांनी केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त समितीच्या श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात श्री. शेख यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, आपल्या करिअरच्या दिशा कशा बदलत गेल्या, हे विषद केले. समितीत सर्वांगीण विकास होतो, ही खूप महत्त्वाची संकल्पना आहे, असेही ते म्हणाले.


सुरुवातीला संस्कृती कुंभार, माधुरी सुरवसे यांनी नृत्य, तर ऋचा मालेगावकर हिने देशभक्तीपर गीत सादर केले. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी स्वागत केले. कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीच्या प्रगतीबाबत सांगताना भाषा वर्ग, रोबोटिक्स लॅब आणि भविष्यकालीन प्रकल्पांबाबत माहिती दिली. यावेळी पाहुण्याच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



सूत्रसंचालन सानिका येळमटे हिने केले.

सुमित्रा सदन वसतिगृहात विश्वस्त विनया ठोंबरे, डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात कार्यकर्त्या सुनंदा पाटील, लजपत संकुल येथे कार्यकर्ते दिनकर वैद्य, अहिल्यानगर येथील मधुभाऊ चौधरी वसतिगृहात अनघा व संजय बंदिष्टी तर कल्याणराव जाधव स्मृती भवन येथे एल ॲण्ड टी कंपनीचे अरविंद पारगावकर यांच्या हस्ते झेंडावंदन झाले.

# ब्रेल वाचन स्पर्धेत अंबिका गवते हिचे यश



महाराष्ट्र दृष्टिहीन संघ, पुणे यांच्यातर्फे राज्यस्तरीय ब्रेल वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत समितीची विद्यार्थिनी अंबिका संजय गवते हिने द्वितीय क्रमांक मिळविला. अंबिका सध्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी.ए. (इकॉनॉमिक्स)च्या प्रथम वर्षात शिकत आहे.

# प्रज्ज्वल सूर्यवंशी याची 'एनडीए'साठी निवड



केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये (एनडीए) अंतिम गुणवत्ता यादीत समितीचा विद्यार्थी प्रज्ज्वल सूर्यवंशी याची निवड झाली. प्रज्ज्वल हा एआयएसएसएमएस (AISSMS) महाविद्यालयाचा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे. डेहराडून येथे झालेल्या एसएसबी मुलाखतीतून त्याची निवड हवाई दलासाठी झाली आहे. येत्या जूनमध्ये तो एनडीएच्या १३७ व्या तुकडीमध्ये प्रशिक्षणासाठी जाणार आहे.



# लतिका गायतोंडे वसतिगृहात व्हिज्युअल आर्ट्स गट

लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात १८ जानेवारीला व्हिज्युअल आर्ट्स या नवीन गटाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विवेक खटावकर तसेच निमिष पोतनीस उपस्थित होते. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविक केले. हेमंत राजहंस यांनी विद्यार्थ्यांना व्हिज्युअल आर्ट्समधील संधींबाबत मार्गदर्शन केले. निमिष पोतनीस याने ओरिगामी कलेच्या माध्यमातून विविध कलाकृती साकार करून दाखविल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धी गागरे हिने केले. या गटाची जबाबदारी प्रज्ञा सातारकर व श्री. राजहंस यांनी स्वीकारली आहे. हा उपक्रम दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी सर्वांसाठी खुला असणार आहे. त्यात विविध कलांमधील तज्ज्ञ येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

### खटावकर यांचे समितीशी जुने नाते

विवेक खटावकर यांचे वडील ५० वर्षांपूर्वी समितीच्या कला गटांतर्गत विद्यार्थ्यांला चित्रकला शिकवित होते. त्यावेळी विवेक खटावकर स्वतःही त्या वर्गांना उपस्थित राहत. या आठवणीला उजाळा देत खटावकर यांनी समितीप्रती कृतज्ञता व्यक्त केली. समितीशी आपले जुने नाते असून कायम समितीसोबत राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले.